मार्च 2016 | ₹ 40 | पृष्ठ संख्या 40 | पुणे, वर्ष 6 | अंक 03

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत



Will bring efficiency

अंमल होईल तो सुवर्णक्षण

Meaningful solution for any economy

## अर्थक्रांती प्रस्तावांचे सादरीकरण पंतप्रधानांनी का घडवून आणले असेल?

सर्वार्थाने क्रांतिकारी

Plan to scrap income tax
gets high-level hearing

अर्थक्रांतीला गेम चेंजर पुरस्कार

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

व्यवस्थापक
अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
**फोन :** 020-25430540,
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

**मार्च** 2016

वर्ष सहावे
अंक तिसरा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
020-25430540
9921926538
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
9922920765
अर्चना जोशी
9552591874

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

## अनुक्रमणिका

04 **अर्थक्रांती प्रस्तावांचे सादरीकरण पंतप्रधानांनी का घडवून आणले असेल? ...**यमाजी मालकर

08 **अर्थक्रांती : मला असे वाटते**

20 **'अर्थक्रांती प्रतिष्ठान'ला गेम चेंजर पुरस्कार ...**

22 **भारताशिवाय पर्याय नाही म्हणून...**भारतीय

24 **शुभस्य शीघ्रम...**प्रशांत बने

26 **तुफानी मत करना, जरा सबुरी से लेना!...**प्रसाद भागवत

28 **mSikkay ॲप...**विभव केळकर

30 **अर्थभान**

32 **अर्थक्रांती न्यूज**

# भूमिका

# अर्थक्रांती प्रस्तावांचे सादरीकरण पंतप्रधानांनी का घडवून आणले असेल?



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**देशवासीयांच्या वृत्तीत नव्हे, तर देशाच्या व्यवस्थेत काहीतरी मोठाच बिघाड झाला आहे, तो शोधून काढून त्याची दुरुस्ती केली पाहिजे, असे काही मोजक्या लोकांना वाटले आणि त्यांनी पूर्ण विचारांती हा रस्ता धरला. त्यामुळेच 'लोग जुडते गए कारवां बनता गया', अशा एका महत्वाच्या टप्प्यावर आज अर्थक्रांती आणि अर्थपूर्ण पोचले आहे. अशा महामार्गाच्या शोधात असाल तर आपले या प्रवासात सहर्ष स्वागत आहे...!**

गेले दोन तीन वर्षे अर्थक्रांती राष्ट्रीय पातळीवर धडका मारत होती. तिला कोणी नाकारत नव्हते आणि कोणी पूर्णपणे स्वीकारतही नव्हते. पण जेव्हा देशाच्या आर्थिक समस्या अधिकच गुंतागुंतीच्या बनू लागल्या आणि त्यांच्या निराकरणासाठी दुढ्ढाचार्यही काही ठोस बोलेनासे झाले तेव्हा अर्थक्रांतीचे सादरीकरण आणि त्यातील व्यवस्था बदलासाठीची सुसंगत उत्तरे अनेकांना आठवायला लागली होती. पण अर्थतज्ञ म्हणून त्याविषयी बोलण्याची जणू चोरी आहे, असे मानून त्याविषयी असे पुस्तकी तज्ज्ञ मूग गिळून बसले होते. अजूनही फार वेगळी परिस्थिती आहे, अशातला भाग नाही, पण आता या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच हा विषय हाती घेतल्याने भविष्यात अर्थक्रांती विषयी देशात व्यापक चर्चा सुरू झाली आहे. भारतीय नागरिकांना प्रामाणिक, शांत, समृद्ध आणि भेदभावमुक्त आयुष्य जगता यावे, यासाठी व्यवस्थेत अमुलाग्र बदलासाठीचा हा अतिशय महत्वपूर्ण टप्पा असल्याने त्याविषयीची माहिती आपण घेतली पाहिजे.

नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदाच्या खुर्चीवर बसल्यावर पुन्हा अर्थक्रांतीची आठवण आली, हे फार महत्वाचे आहे. पुन्हा, यासाठी की ते गुजरातचे मुख्यमंत्री होते, तेव्हा (सप्टेंबर 2013) अर्थक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल बोकील आणि काही सहकाऱ्यांना अहमदाबादेतील सचिवालयात त्यांनी 15 मिनिटे दिली होती. पण अर्थक्रांतीचे सादरीकरण सुरू झाले आणि दीड तास कधी झाला, हे लक्षातच आले नाही. मोदी यांनी त्यावेळी आपली पुढील भेट रद्द करून अर्थक्रांती समजून घेतली होती. 'आपण म्हणता ते मला पटते आणि त्यासाठी काय करता येईल, ते मी पाहीन' एवढीच त्यांची अखेरीस प्रतिक्रिया होती. त्यांना अर्थक्रांतीचे मुद्दे इतके पटले होते की त्यानंतर पक्षाच्या व्यासपीठावर दिल्लीतही हे सादरीकरण घडवून आणले. (त्यांनी सत्तेवर येताच जन धन आणि डिजिटल आर्थिक व्यवहारांवर दिलेला जोर आपण पाहतोच आहोत.) अर्थक्रांतीच्या पाच प्रस्तावांच्या आधारे देशाच्या व्यवस्थेत सकारात्मक बदल होऊ शकतो, असे फार पूर्वीपासून मानणारे नितीन गडकरी त्यावेळी भाजपच्या व्हीजन डॉक्युमेंट कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांच्या दृष्टीने एक मोठीच संधी चालून आली होती. म्हणून त्यांनी सुब्रमण्यम स्वामींच्या साथीने एक पत्रकार परिषद घेतली आणि अर्थक्रांती हा आमच्या पक्षाच्या व्हीजन डॉक्युमेंटचा भाग असेल, असे जाहीर करून टाकले. (डिसेंबर 2014) देशात त्यावेळी त्यावर उलट सुलट चर्चा झाली, ती निवडणुकीपर्यंत चालली. आम्ही करपद्धती सोपी आणि सुटसुटीत करणार आहोत, असे भाजप नेते प्रचार सभांत सांगू लागले. ज्या मुद्द्याचे आकलन आम जनतेला होत नाही, तो मुद्दा प्रचारात आणायचा नाही, असा राजकारणात अलिखित नियम आहे. त्याचे कारण विरोधी पक्ष त्याचा कसा वापर करेल, हे सांगता येत नाही. कर सोपे आणि सुटसुटीत करणार, याचा उलटा प्रचार असा सुरू झाला की हा पक्ष सत्तेवर आला की सर्वांवर नवा कर लावणार. झाले, या कुस्तीत आपली हार ठरलेली आहे, असे मानून भाजपने हा मुद्दा हळूहळू गुंडाळून ठेवला. त्याची चर्चा पूर्णपणे थांबविण्यात आली. आपल्या देशात






## आगामी अंक
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अर्थक्रांती
## विशेषांक

मुळात अर्थशास्त्रज्ञ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांकडे गेली 68 वर्षे देशाने दुर्लक्ष केले की त्याविषयी बोलणे धुरीणांना गैरसोयीचे वाटले? अर्थकारणाविषयी डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या मुलभूत चिंतनाची आणि अर्थक्रांतीची नाळ का जुळते आहे? आजच्या आर्थिक गदारोळात डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार का समजून घेतले पाहिजेत?

याला राजकीय शहाणपण म्हणतात.

मुळात करपद्धतीचा मुद्दा निवडणुकीचा मुद्दा होण्याचे दिवस अजून भारतात यायचे आहेत. कारण जे 126 कोटी म्हणजे देशातला प्रत्येक नागरिक अप्रत्यक्ष कर भरतो आणि देश त्यावर चालतो, पण आपण इतका कर भरतो, हे त्यालाच माहीत नाही. बहुतेकांच्या दृष्टीने प्राप्तिकर हाच एकमेव कर आहे! शिवाय एकूण कर आणि जीडीपीचा विचार केला तर त्यात करांचा वाटा केवळ 16 टक्के आहे, हे जाणकार सर्वांना माहीत असूनही त्याविषयी फारसे बोलले जात नाही. वास्तविक ज्या देशांशी आपण आपली तुलना करतो, त्या इमर्जिंग मार्केट इकोनॉमी देशांत हे प्रमाण 21 टक्क्यांपेक्षा जास्त तर 'चांगल्या मानवी जीवनासाठी चांगली धोरणे' असे ब्रीद असलेल्या 35 विकसित (OECD) देशांत ते 34 किंवा त्यापेक्षा जास्त आहे. आपण मात्र आपला देश 16 टक्क्यांवर चालवून आपल्या सार्वजनिक सेवा लाजिरवाण्या करून ठेवल्या आहेत. दुर्दैवाचा भाग असा की केवळ आर्थिक साक्षरतेअभावी देशात त्याची आज चर्चा होऊ शकत नाही. भावनिक विषयावर स्वार होणारे राजकीय पक्ष त्याविषयी बोलण्याची हिंमत करत नाहीत.

असे असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेब्रुवारी 2016 च्या पहिल्या आठवड्यात केंद्रीय सचिवांच्या उपगटासमोर अर्थक्रांतीचे सादरीकरण घडवून आणले. (पुढील पानांवर इंग्रजी The Hindu आणि हिंदी 'दैनिक भास्कर' मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या पहा) हा टप्पा महत्वाचा यासाठी आहे की देशात एवढा मोठा बदल होण्यासाठी त्याची राष्ट्रीय पातळीवर चर्चा होणे आवश्यक आहे. त्याची चांगली आणि अधिकृत सुरुवात या घटनेने झाली आहे. अर्थक्रांती समजून घेणारे आणि तिचे महत्व जाणणारे नागरिक आज संख्येने कमीच आहेत. पण या कळीच्या बदलाचे मर्म त्यांना कळले आहे. त्यामुळेच या घटनेचा अशा सर्वांना अतिशय आनंद झाला आहे. अर्थक्रांतीच्या प्रसाराचे काम करणाऱ्या 'अर्थपूर्ण' च्या पाच वर्षांच्या प्रवासातील हा फार मोठा टप्पा आहे. त्यामुळे त्या बातम्या आणि त्यावर काही जागरूक नागरिक आणि जाणकारांची मते आम्ही प्रसिद्ध केली आहेत.

ज्या रस्त्याने अजून कोणी चाललेले नाही, जो रस्ता खडतर आहे, पण तो या देशातील व्यवस्था पारदर्शी करणार आहे, आपसातील भेदांच्या भिंती तोडून टाकणार आहे, या देशाचे भविष्य घडविणार आहे, सर्वांना मानवी प्रतिष्ठा देणारी व्यवस्था हवी, असे म्हणण्याचे धाडस करणार आहे, अशा या रस्त्यावरून अर्थक्रांतीचा प्रवास 16 वर्षांपूर्वी सुरू झाला होता. देशवासीयांच्या वृत्तीत नव्हे, तर देशाच्या व्यवस्थेत काहीतरी मोठाच बिघाड झाला आहे, तो शोधून काढून त्याची दुरुस्ती केली पाहिजे, असे काही मोजक्या लोकांना वाटले आणि त्यांनी पूर्ण विचारांती हा रस्ता धरला. त्यामुळेच 'लोग जुडते गए कारवां बनता गया', अशा एका महत्वाच्या टप्प्यावर आज अर्थक्रांती आणि अर्थपूर्ण पोचले आहे. अशा महामार्गाच्या शोधात असाल तर आपलेही या प्रवासात सहर्ष स्वागत आहे...!